# जिल्हा परिषद, सांगली

## कृषि विभाग मार्फत सन २०२४-२५ मध्ये शेतक-यासाठीच्या योजना

| अ.क्र | योजनेचे नाव | परिमाण (Speification) | अनुदान मर्यादा | लाभार्थी निवड निकष |
|---|---|---|---|---|
| १ | ५०% अनुदानावर चाफकटर पुरविणे | इलेक्ट्रीक मोटर चलीत 2 HP (ISIमार्क) वटेस्ट रीपोर्ट आवश्यक | खरेदी किमतीच्या ५०% (GSTवगळून) किंवा रु. १०,०००/- जास्तीत जास्त यापैकी जे कमी असेल सर्व प्रर्वगासाठी | १.यापूर्वी जि.प.च्या कडवाकुट्टी मशिन/ट्रॅक्टर/पी.व्ही.सी./एच.डी.पी.पाईप/ ढेंचा/ ताग बियाणे/ औषध फवारणी पंप या वैयक्तिक योजनेचा लाभ घेतलेला नसावा.<br>२.स्वतःचे नावे ७/१२ व खाते उतारा असावा.<br>३.महिला लाभार्थी व अल्प, अत्यल्प भूधारक शेतक-यांना प्राधान्य राहील.<br>४.दिव्यांग व्यक्तींना प्राधान्य देण्यात येईल.<br>५.कडवाकुट्टी मशिन करीता अर्जदार शेतक-यांकडे पशुधन असलेबाबतचा पशुवैघकीय यंत्रणेचा दाखला.<br>६.ढेंचा/ताग बियाणे योजनेसाठी सांगली जिल्हयातील खातेदार शेतकरी पात्र राहतील. |
| २ | जिल्हयातील शेतक-यांना प्रति ट्रॅक्टर रु.१,००,००० अनुदान देणे | ट्रॅक्टर ८ ते ८० PTO HP | रक्कम रु.१,००,०००/- सर्व प्रर्वगासाठी | |
| ३ | जिल्हयातील शेतक-यांना पी.व्ही.सी./एच.डी.पी. पाईप पुरवठा करणे | ISI मार्क असलेले / मान्यताप्राप्त कृषि विदयापिठ / केंद्र शासनाने मंजूरी दिलेल्या संस्थेकडील तपासणी अहवाल आवश्यक, ६३ से.मी. ते ९० से.मी. २० फुट लांब पाईप, | पी.व्ही.सी. पाईप किमतीच्या ५० टक्के रु.३५/- प्रती मीटर मर्यादेत, एच.डी.पी.पाईप किमतीच्या ५० टक्के रु.५०/-<br>प्रती मीटर मर्यादेत किंवा एका शेतक-यांला जास्तीत जास्त १०००० मर्यादेतच अनुदान देय राहील. सर्व प्रर्वगासाठी | |
| ४ | जिल्हयातील शेतक-यांना ढेंचा/ ताग बियाणे खरेदी करुन पाठविणे. | महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ या शासकिय संस्थेकडील ढेंचा/ ताग | प्रति किलो रक्कम रु.५५/- या प्रमाणे ४० किलो साठी प्रती लाभार्थी सर्व प्रर्वगासाठी | |
| ५ | जिल्हयातील शेतक-यांना औषध फवारणी पंप पुरवठा करणे | तपारणी अहवाल ,डब्बल मोटर,क्षमता २० लीटर, बॅटरीचलीत, घेण्यात येणारा पंप हा विक्री पश्चात सेवा हमी साठी खालील अटी व शर्ती देण्यात येत आहेत.अधिकृत विक्रेतेयांचे कडील, सेवा देण्याचा अनुभव १० वर्षाचा असावा, सहा महिन्यातून एक दुरुस्ती मेळावा तालुकास्तरावर घेणे. | खरेदी किमतीच्या ५०% (GSTवगळून) किंवा रु. २०००/- जास्तीत जास्त यापैकी जे कमी असेल सर्व प्रर्वगासाठी | |

Scanned with CamScanner

१. योजनेसाठी अर्जांचा नमुना गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचेकडे उपलब्ध असून तालुकास्तरावरच मागणी अर्ज आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण करुन पं.स. कडे सादर करावा.

२. लाभ घेऊ इच्छिणा-या लाभार्थीने ज्या घटकासाठी अर्ज करावयाचा आहे. त्या घटकाचा जिल्हा परिषदेच्या अन्य योजनेतून लाभ घेतलेला नसावा.

३. लाभार्थी निवड सर्व प्राप्त अर्ज संकलित केलेनंतर लॉटरी पध्दतीने करणेत येईल.

४. मंजूर लाभार्थीने पूर्व संमतीनंतर वरील वस्तूंची खरेदी कॅशलेस पध्दतीने खुल्या बाजारपेठेतून करावयाची असून अनुदानाची रक्कम ऑनलाईन पध्दतीने त्यांचे बँक खातेवर वर्ग करणेत येईल.

५. विहीत मानकांची तसेच शासकीय /मान्यता प्राप्त संस्थेचा तपासणी अहवाल असणारी वस्तू/ औजारे खरेदी करणक बंधनकारक राहील. अन्यथा अनुदानास अपात्र ठरविणेत येईल.

६. गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचेकडे २६/०९/२०२४ अखेर प्राप्त अर्जाचा विचार केला जाईल.या तारखेनंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

७. कोणत्याही परिस्थितीत जिल्हा परिषद मुख्यालयामध्ये लाभार्थीचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

कृषि विकास अधिकारी
जिल्हा परिषद सांगली.

Scanned with CamScanner